26 JUN 2022

जनसंपर्क कक्ष
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# द. कोरियातील विद्यार्थी विद्यापीठात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ब्रेन कोरिया-२०२२ या शिष्यवृत्ती उपक्रमाच्या माध्यमातून दक्षिण कोरियातील जेजू नॅशनल युनिव्हर्सिटीतील तीन विद्यार्थी शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी या अधिविभागात संशोधनाचं प्रशिक्षण घेण्यासाठी दाखल झाले आहेत. यात तिकडे शिक्षण घेत असलेले मूळचे भारतीय वंशाचे महेश चौगुले, स्वप्निल पाटील यांच्यासह जुंगमिन किम या दक्षिण कोरियन संशोधकांचाही समावेश आहे.

हे विद्यार्थी कोरियातील स्टुडंट एक्स्चेंज प्रोग्रॅमच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठात शिकण्यासाठी आले आहेत. ते प्रामुख्याने 'सिग्नल प्रोसेसिंग अँड मशीन लर्निंग' या विषयाचे शिक्षण घेत आहेत. विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीमधील सहायक प्राध्यापक डॉ. तुकाराम डोंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली ते काम करणार आहेत. त्यांच्या संशोधनाचे काम सिग्नल प्रोसेसिंग, मशीन लर्निंग, इंटरनेट ऑफ थिंग्स हे असून, विद्यार्थ्यांच्या या शिक्षणाचा संपूर्ण खर्च दक्षिण कोरियन सरकार करीत आहे. या उपक्रमासाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरूरु डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, विद्यापीठ इंटरनॅशनल स्टुडंट सेलचे समन्वयक डॉ. ए. व्ही. घुले यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

पुढारी

# स्कूल ऑफ नॅनो सायन्समध्ये दक्षिण कोरियातील विद्यार्थी

**कोल्हापूर :** ब्रेन कोरिया-२०२२ शिष्यवृत्ती उपक्रमाच्या माध्यमातून जेजू नॅशनल युनिव्हर्सिटी, दक्षिण कोरिया येथील तीन विद्यार्थी शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी या अधिविभागात संशोधन प्रशिक्षणासाठी आले आहेत. महेश चौगुले, स्वप्नील पाटील या भारतीय विद्यार्थ्यांसोबतच जुंगमिन किम या दक्षिण कोरियाच्या संशोधक विद्यार्थ्यांचा समावेश आहे. हे विद्यार्थी स्टुडंट एक्स्चेंज प्रोग्रामच्या माध्यमातून विद्यापीठात शिकण्यासाठी आले आहेत.

2 6 JUN 2022 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाहू महाराजांनी धर्मक्षेत्र कुरुक्षेत्र बनवून संघर्ष केला

## - डॉ. राजा दीक्षित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आपल्या विचार आणि आचाराने समतेचा पुरस्कार करणाऱ्या राजर्षी शाहू महाराज यांनी प्रतिगामी शक्तींचा मुकाबला करण्यासाठी धर्मक्षेत्रास कुरुक्षेत्र बनवून संघर्ष सुरू केला, प्रतिपादन डॉ. राजा दीक्षित यांनी केले.

राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टतर्फे शाहू जयंती निमित्त आयोजित राजर्षी शाहू व्याख्यानमालेत 'राजर्षी शाहूंचा धर्मविचार' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार होते.

डॉ. दीक्षित म्हणाले, राजर्षी शाहू महाराज यांच्या धर्मविचारांबाबत दोन टप्प्यात मांडणी करावी लागते. पहिल्या टप्प्यात शाहू महाराज सर्वसामान्य हिंदुप्रमाणे आस्तिक होते. वैयक्तिक जीवनात ते सर्वसामान्यांप्रमाणे सर्व व्यवहार करीत. मात्र १८९९ मध्ये घडलेल्या वेदोक्त प्रकरणामुळे त्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल झाला. या घटनेनंतर विद्रोही बनले. त्यांनी देव आणि माणूस यांच्या मध्यस्थ कोणी नसावा, अशी भूमिका घेतली. समाजसुधारणांच्या चळवळींना




**कोल्हापूर : राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टतर्फे आयोजित व्याख्यानमालेत बोलताना डॉ. राजा दीक्षित. डावीकडून राजदीप सुर्वे, दत्तात्रय कवतिके, डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. अवनीश पाटील. (छाया : नाज ट्रेनर)**

**राजर्षी शाहू व्याख्यानमाला**

प्रोत्साहन दिले. पुरोहितशाही आणि ब्राह्मणी वर्चस्वाविरोधात त्यांनी संघर्ष सुरू केला. हा संघर्ष करीत असताना त्यांनी आचार आणि विचारात विलक्षण एकरूपता ठेवली.

डॉ.दीक्षितम्हणाले,पौरोहितशाही-ब्राह्मणी वर्चस्व संपविण्यासाठी शाहू महाराज यांनी वैदिक स्कूल आणि क्षात्रजगद्गुरूची नियुक्ती केली. वैदिक स्कूलच्या माध्यमातून सर्व समाजघटकांना पौरोहित्य करण्याची संधी निर्माण केली. या सर्व कामात सनातन्यांच्या टीकेला भीक घातली नाही. तसेच पुरोगाम्यांच्याही टीकेकडे दुर्लक्ष केले. ब्राह्मणी नोकरशाहीला पर्यायी नोकरशाही निर्माण केली. १८९९ ते १९२२ या कालावधीत शाहू महाराज यांनी सामाजिक बंडखोरी सोडली नाही. विविध उदारमतवादी चळवळींना मदत व प्रोत्साहन दिले.

यावेळी डॉ. जयसिंगराव पवार यांनी मनोगत व्यक्त केले. स्वागत जिल्हा पुरवठा अधिकारी दत्तात्रय कवतिके यांनी केले. प्रास्ताविक शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे डॉ. अवनीश पाटील यांनी केले. यावेळी राजदीप सुर्वे आणि डॉ. अशोक चौसाळकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

26 JUN 2022
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात दक्षिण कोरियातील संशोधक विद्यार्थी

कोल्हापूर : प्रतिनिधी

ब्रेन कोरिया-२०२२ या शिष्यवृत्ती उपक्रमाच्या माध्यमातून जेजू नॅशनल युनिव्हर्सिटी, दक्षिण कोरिया येथील तीन विद्यार्थी शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी या अधिविभागात संशोधनाच्या प्रशिक्षणासाठी आले आहेत. कोरियामध्ये संशोधनाचे शिक्षण घेणाऱ्या महेश चौगुले, स्वप्नील पाटील या भारतीय विद्यार्थ्यांसोबतच



जुंगमिन किम या दक्षिण कोरियाच्या संशोधक विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

कोरियातील विद्यार्थी स्टुडंट एक्सचेंज प्रोग्रामच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठात शिकण्यासाठी आले आहेत. हे विद्यार्थी शिवाजी विद्यापीठात प्रामुख्याने 'सिग्नल प्रोसेसिंग अँड मशीन लर्निंग' या विषयाचे शिक्षण घेत आहेत. विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीमधील सहायक प्रा. डॉ. तुकाराम डोंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली ते काम करणार आहेत. त्यांच्या संशोधनाचे काम सिग्नल प्रोसेसिंग, मशीन लर्निंग, तसेच इंटरनेट ऑफ थिंग्स हे असून, सदरच्या विद्यार्थ्यांच्या या शिक्षणाचा संपूर्ण खर्च 'गव्हर्न्मेंट ऑफ साऊथ कोरिया' करत आहे.

या उपक्रमासाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत तसेच विद्यापीठाच्या इंटरनॅशनल स्टुडंट सेलचे समन्वयक डॉ. ए. व्ही. घुले यांचे सहकार्य लाभले.

सकाळ

# दक्षिण कोरियातील संशोधक घेणार विद्यापीठात धडे

## नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीमध्ये प्रशिक्षण

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २५ :** ब्रेन कोरिया-२०२२ या शिष्यवृत्ती उपक्रमाच्या माध्यमातून जेजू नॅशनल युनिव्हर्सिटी, दक्षिण कोरिया येथील तीन विद्यार्थी शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी या अधिविभागात संशोधनाचं प्रशिक्षण घेण्यास आले आहेत.



त्यामध्ये तिकडे संशोधन शिक्षण घेत असणाऱ्या महेश चौगुले, स्वप्निल पाटील या भारतीय विद्यार्थ्यांसोबतच जुंगमिन किम या दक्षिण कोरियाच्या संशोधक विद्यार्थ्यांचा समावेश आहे. हे विद्यार्थी स्टुडंट एक्स्चेंज प्रोग्रामच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठात शिकण्यासाठी आलेले असून हे विद्यार्थी प्रामुख्याने 'सिग्नल प्रोसेसिंग अँड मशीन लर्निंग' या विषयाचे शिक्षण घेत आहेत.

विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नानोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीमधील सहायक प्राध्यापक डॉ. तुकाराम डोंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली ते काम करणार आहेत. त्यांच्या संशोधनाचं काम सिग्नल प्रोसेसिंग, मशीन लर्निंग, तसेच इंटरनेट ऑफ थिंग्स हे असून विद्यार्थ्यांच्या या शिक्षणाचा संपूर्ण खर्च 'गव्हनमेंट ऑफ साऊथ कोरिया' करीत आहे. स्टुडंट एक्स्चेंज प्रोग्रॅममुळे शिवाजी विद्यापीठाचे नाव पुन्हा एकदा जागतिक स्तरावर गेले आहे. उपक्रमासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत तसेच विद्यापीठाच्या इंटरनॅशनल स्टुडंट सेलचे समन्वयक प्रा. डॉ. ए. व्ही. घुले यांचे सहकार्य लाभले.

2 6 JUN 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पत्रकारितेतील विद्यार्थ्यांचा गौरव

## शाहू कृतज्ञता पर्वात योगदान; जिल्हा प्रशासनाच्या वतीने प्रमाणपत्र



कोल्हापूर : माहिती उपसंचालक डॉ. संभाजी खराट व डॉ. शिवाजी जाधव यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. या वेळी डॉ. सुमेधा साळुंखे, वृषाली पाटील, फारुक बागवान उपस्थित होते.

कोल्हापूर, ता. २५ : राजर्षी शाहू महाराज स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त कोल्हापुरात लोकराजा राजर्षी शाहू महाराज 'कृतज्ञता पर्व' साजरे झाले. या लोकोत्सवात शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवत जिल्हा प्रशासनाकडून राबवण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांच्या प्रसिद्धीत योगदान दिले. याबद्दल जिल्हा प्रशासनाच्या वतीने कोल्हापूर विभागाचे माहिती उपसंचालक डॉ. संभाजी खराट यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरव केला.

उपक्रमामध्ये बी. जे., एम. जे., मास कम्युनिकेशन आणि पी.जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम आदी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी सहभागी झाले. जिल्हाधिकारी कार्यालयात या संदर्भात नियोजनाच्या बैठका झाल्या. बैठकीला पत्रकारिता विभागातील डॉ. शिवाजी जाधव, विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

दरम्यान, माहिती उपसंचालक डॉ. संभाजी खराट व जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के यांच्या मार्गदर्शनाखाली ''प्रसिद्धी टीम'' तयार करून विविध कार्यक्रमांच्या प्रसिद्धीचे नियोजन केले. विभागीय व जिल्हा माहिती कार्यालयासोबत विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमांचे कव्हरेज केले. यासाठी पत्रकारिता व जनसंज्ञापन विभाग प्रमुख प्रा. डॉ. निशा पवार, डॉ. शिवाजी जाधव यांचे सहकार्य मिळाले. कृतज्ञता पर्व उपक्रमांतर्गत त्या त्या कार्यक्रमाची पार्श्वभूमी, कार्यक्रम बातम्या, विशेष वृत्त, ऑडिओ व्हिडिओ वृत्तसंकलन आदी माध्यमातून जिल्हा प्रशासनाचे विविध उपक्रम जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. कृतज्ञता पर्व प्रसिद्धी कार्यात विद्यार्थी व पत्रकारिता विभागाचे महत्त्वपूर्ण सहकार्य मिळाले. असे सांगून पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांना शासकीय जनसंपर्क व प्रसिद्धी व्यवस्थेची माहिती देण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभाग सदैव तत्पर आहे, असे प्रतिपादन माहिती उपसंचालक डॉ. संभाजी खराट यांनी केले.